महाराष्ट्र विधानसभा

तिसरे अधिवेशन, २०२२

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील शिक्षकांना निवडणुकीच्या कामातून वगळण्याबाबत

(१) ७२ (०७-०४-२०२०). श्री.राजन साळवी (राजापूर), डॉ.किरण लहामटे (अकोले), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिक्षकांना निवडणुकीची कामे सोपविण्यात आली असून सदर कामे करण्यास शिक्षकांनी असमर्थता दर्शविली असून याबाबत शिक्षक समिती मार्फत संबधित तहसीलदार, जिल्हाधिकारी यांना दिली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विशेषतः सेलु (जि.परभणी), व राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील शिक्षकांना निवडणुकीची कामे सोपविण्यात आली असल्याने कामाचा ताण वाढून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर त्याचा विपरित परिणाम होत असल्याने निवडणुकीच्या कामातून शिक्षकांना वगळण्याबाबतची मागणी देखील केली आहे हे हि खरे आहे काय,

(३) असल्यास, निवेदन व मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती वर्षा गायकवाड (१६-०६-२०२२) :(१) होय

(२) होय

(३) राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांतील शिक्षकांना कोणतीही अशैक्षणिक कामे देऊ नयेत. फक्त निवडणूका व जनगणना यासारखी राष्ट्रीय महत्वाची कामे देणे आवश्यक असल्यास ती केवळ सुट्टीच्या दिवशी व अशैक्षणिक कालावधीमध्ये देण्यात यावीत, असा शासन निर्णय क्र.पीआरई -२००८/(२५२/२०८)प्राशी-१, दि.१.८.२००८ निर्गमित करण्यात आला आहे.तसेच,यासंदर्भात शासनस्तरावरून वेळोवेळी सूचनाही देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

जळगांव जिल्ह्यात संचमान्यतेत गैरव्यवहार झाल्याबाबत

(२) ११३१ (०८-०४-२०२०). श्री.किशोर पाटील (पाचोरा) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हयाचे शिक्षणाधिकारी (माध्य.) श्री.देविदास महाजन हे या पदावर कार्यरत असतांना दिनांक १३ ऑगस्ट, २०१५ ते ३१ मे, २०१९ या कालावधीत पी.के. विद्यालय, पाचोरा, जय योगेश्वर माध्यमिक विद्यालय, अंमळनेर, सिंधी हायस्कूल, जळगांव, श्री साई समर्थ मा.वि.पथराड, मा.वि. हातले, (ता.चाळीसगांव), मा.वि. मुंदखेडे, (ता.चाळीसगाव) या व अन्य शाळेच्या संस्थांनी चुकीच्या पध्दतीने सन २०१५-१६ च्या संचमान्यतेतील प्रस्तावित पदे मंजूर पदात टाकून नविन संच मान्यता प्राप्त करण्यात आल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षणाधिकारी श्री.देविदास महाजन यांची स्वाक्षरी स्कॅन करुन प्रस्ताव शालार्थसाठी शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग येथे पाठविण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अशाच पध्दतीने बनावट सहया व खोटे आवक-जावक क्रमांक असलेली प्रकरणे दाखल करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करुन कारवाई करण्याबाबत शिक्षणाधिकारी यांनी मा. शिक्षण उपसंचालक, नाशिक यांना दिनांक ५ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास विनंती करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्रीमती वर्षा गायकवाड (२६-०६-२०२२) : (१) होय
(२), (३), (४), (५) व (६) याबाबत दिनांक २१.०१.२०२० रोजी झालेल्या बैठकीमध्ये सदर प्रकरणी कारवाईचे आदेश देण्यात आलेले आहेत. त्या अनुषंगाने संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे यांच्या स्तरावर पुढील कार्यवाही सुरू आहे.

पुणे जिल्ह्यातील खाजगी अनुदानित प्राथमिक शाळांमध्ये शिक्षक आणि तुकड्या मान्यतेचे बनावट आदेश दिल्याबाबत

(३) ८८२५ (२९-०५-२०२०). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यातील खाजगी अनुदानित प्राथमिक शाळांमध्ये शिक्षणाधिकारी आणि संस्थाचालक यांच्या संगनमताने शिक्षक मान्यता आणि तुकड्या मान्यतेचे बनावट आदेश देण्यात आलेले शिक्षक कार्यरत असून गत अनेक वर्षांपासून वेतन घेत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन संबंधित अधिकारी, संस्थाचालक तसेच शिक्षक अशा २८ व्यक्तींवर बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून याचा तपास अतिशय संथ गतीने सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने या प्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यानुसार नियमबाह्यरित्या शिक्षकांची नेमणूक व तुकड्या मान्यतेचे आदेश देऊन झालेल्या गैरव्यवहाराची व्याप्ती लक्षात घेता या गैरव्यवहारात समाव ष्ट असलेल्या खाजगी अनुदानित प्राथमिक शाळांच्या व्यवस्थापनावर काेणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिपक केसरकर (१३-०७-२०२२) : (१), (२) व (३) पुणे जिल्हयात १८ शिक्षकांच्या मान्यता बनावट असल्याचे निदर्शनास आल्याने सदर प्रकरणाशी संबधीत अधिकारी, संस्थाचालक तसेच संबधीत १८ शिक्षक अशा २८ व्यक्तींवर बंडगार्डन पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

औरंगाबाद जिल्हा परिषदेतून शिक्षक मान्यतेचे नोंदी गहाळ झाल्याबाबत

(४) १२७७५ (१३-०९-२०२०). श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद जिल्हा परिषदेतून सन २०१२ नंतरचे शिक्षक मान्यतेचे नोंदी गहाळ झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणात गैरव्यवहार झाला असल्याचेही निदर्शनास येत आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने याप्रकरणी चौकशी करून दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. दिपक केसरकर (१३-०७-२०२२) : (१) नाही
(२) नाही
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

आर्वी-आष्टी-कारंजा (जि.वर्धा) तालुक्यांतील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत

(५) १४८४८ (१६-०९-२०२०). श्री.दादाराव केचे (आर्वी) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आर्वी-आष्टी-कारंजा (जि.वर्धा) तालुक्यांतील शेतकऱ्यांनी हजारो रुपयांचा खर्च करुन चांगले उत्पन्न येण्यासाठी शेतात सोयाबिनचे पिक लावुन पिकांचे संगोपन करून एका महिन्यांत पिक हातात येणार होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सततचा पाऊस, खोडकिड, बुरशीजन्य रोग, तांबेरा व सततचे ढगाळी वातावरण इत्यादी कारणामुळे सोयाबीन पिकांवर रोगांचा प्रादुर्भाव झाल्यामुळे पिकांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आर्वी-आष्टी-कारंजा तालुक्यांतील लोकप्रतीनीधी व शासकीय अधिकारी यांनी संपुर्ण भागाचा पाहणी दौरा केला असून या भागातील अंदाजे ३२ हजार हेक्टर सोयाबिन पिकांचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडल्याने आर्वी-आष्टी-कारंजा तालुक्यांतील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना एकरी २५ हजार रूपये आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अब्दुल सत्तार (०५-०९-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) वर्धा जिल्ह्यामधील विविध नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या शेतीपिकांच्या तसेच मालमत्तेच्या नुकसानीकरिता अद्यापर्यंत रू.६४४.५३ लक्ष एवढा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील ५ शहरांमधील हवेच्या दर्जात सुधारणा करण्याबाबत

(६) १८६५३ (२६-११-२०२०). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिस्टीम ऑफ एअर क्वालिटी ॲन्ड वेदर फोरकास्टिंग अँड रीसर्चच्या (सफर) दिनांक ३ ऑक्टोबर, २०२० रोजीच्या नोंदीनुसार मुंबईतील कुलाबा, सायन, कुर्ला, पवई, अंधेरी, बोरिवली, भांडुप येथील हवेचा गुणवत्ता निर्देशांक मध्यम; विलेपार्ले, नवी मुंबई, वांद्रे-कुर्ला संकुल येथील निर्देशांक वाईट तर माझगाव, चेंबूर, मालाड या ठिकाणचा निर्देशांक अति वाईट असा नोंदविला गेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईसह राज्यातील काही शहरांमधील हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी केंद्र शासनाने राज्य शासनाला ३९६ कोटी ५० लाख रुपये इतका निधी उपलब्ध करून दिला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या निधीपैकी मुंबईला २४४ कोटी, पुण्याला ६७ कोटी, नागपूरला ३३ कोटी, नाशिकला २० कोटी ५० लाख, औरंगाबादला १६ कोटी व वसई-विरारसाठी १६ कोटी रुपये मिळणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त निधीमधून या शहरांतील हवेच्या गुणवत्ता निर्देशांकात सुधारणा करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२६-०७-२०२२) : (१) हे खरे नाही.

सिस्टीम ऑप एअर क्वालिटी ॲन्ड वेदर फोरकास्टिंग ॲण्ड रीसर्चच्या (सफर) दिनांक ३ ऑक्टोंबर, २०२० रोजीच्या नोंदींनुसार कुलाबा, सायन, पवई, बोरीवली, चेंबुर, मालाड व वरळी येथील हवेचा गुणवत्ता निर्देशांक समाधानकारक असा नोंदविला आहे.

तसेच, अंधेरी विलेपार्ले, नवी मुंबई येथील हवेचा निर्देशांक मध्यम असा नोंदविला आहे. भांडुप व माझगाव येथील हवेचा गुणवत्ता निर्देशांक चांगला असा नोंदविला आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) या शहरांतील हवेच्या गुणवत्ता निर्देशांकात सुधारणा करण्यासाठी उपरोक्त शहरातील स्थानिक स्वराज्य संस्थांनी हाती घेण्यात आलेल्या प्रकल्पांची यादी सादर केली आहे. सदर प्रकल्पांवरील काम प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

बुलढाणा जिल्हयात सोयाबीनच्या सुड्या जाळण्याचे प्रमाण वाढत असल्याबाबत

(७) ३२२५७ (०५-०८-२०२१). श्रीमती श्वेता महाले (चिखली) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्ह्यात सोयाबीनची कापणी करताना जमीन ओली राहिल्याने रब्बी पिकांची पेरणी करावी लागत असल्याने शेतकरी सोयाबीनची कापणी झाल्यावर मळणी न करता सुडी लावून ठेवतो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त जिल्ह्यात यावर्षी शेकडो सुड्यांना आग लावण्यात आली असून राज्यभरात सोयाबीन सुड्यांना आगी लावून नुकसान होण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले असून सुड्या जाळल्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी प्रशासनाच्या माध्यमातून शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त सुड्या व गंजी जाळू नये याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या व शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (२४-०३-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

सन २०२१-२२ मध्ये बुलढाणा तालुक्यात १ तर चिखली तालुक्यात ५ सुड्या जळाल्याच्या तक्रारी प्राप्त आहेत.
(३) सोयाबीनच्या सुड्या व गंजी जाळण्याची घटना या प्रामुख्याने वैयक्तिक हेवेदाव्यामधून घडल्याने, त्याबाबत भारतीय दंड विधान अंतर्गत फिर्यादीकडून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

माझगांव मुंबई येथील सिद्धि सहकारी गृहनिर्माण, आंबेवाडी गृहनिर्माण व अहमद बिल्डिंग टेनन्स गृहनिर्माण संस्थांची हस्तांतरण प्रक्रिया पूर्ण होणेबाबत

(८) ३२७२२ (१०-०१-२०२२). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सिद्धि सहकारी गृहनिर्माण संस्था, मुगभाट लेन, तात्या घारपुरे पथ, उरणकर वाडी, गिरगांव, मुंबई-०४, आंबेवाडी सहकारी गृहनिर्माण संस्था, सीएस क्र.३६९, १/३६९, म्हातारपाखाडी रोड, माझगांव, मुंबई - १० तसेच अहमद बिल्डिंग भाडेकरु सहकारी गृहनिर्माण संस्था, म्हातारपाखाडी गनपावडर रोड, माझगांव मुंबई-१० हया तिन्ही सहकारी संस्थांची मिळकत देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी संस्थेला हस्तांतरीत करण्याकरिता माहे सप्टेंबर-ऑक्टोबर २०२० मध्ये शासनातर्फे सदरहू संस्थांचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांना माहे जुलै, २०२१ रोजी वा त्यादरम्यान अग्रेषित करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी सुनावणी घेऊन कार्यवाही करण्यासाठी तीनही संस्थेंच्या प्रतिनिधींनी दिनांक २० सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी यांची प्रत्यक्ष भेट घेऊन निवेदन सादर केलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी सदरहू सहकारी गृहनिर्माण संस्थांची विनाविलंब सुनावणी घेऊन मिळकत संस्थेस कायदेशीर तरतुदीनुसार हस्तांतरीत करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळा साहेब थोरात (२८-०६-२०२२) : (१) व (२) हे खरे आहे.

(३) प्रकरणी भाडेपट्टाधारक यांचे वारसांनी मा. उच्च न्यायालयाकडील प्रोबेट सादर केले असून मिळकतीचे नुतनीकरण त्यांचे नावे करणेची विनंती केली आहे. तसेच सहकारी गृहनिर्माण संस्थांनी ही नुतनीकरण त्यांचे नावे करणेस विनंती केली आहे. सदरचे प्रकरण अर्धन्यायीक असल्याने सर्व संबंधीतांस दि. ०८.१२.२०२१, दि. ०२.०३.२०२२, दि. १५.०२.२०२२ व दि. २२.०४.२०२२ रोजी सुनावणी देणेत आलेली असुन, सुनावणीची कार्यवाही जिल्हाधिकारी, स्तरावरुन सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नवी मुंबईतील औद्योगिक क्षेत्रातून रासायनिक द्रव्य नाल्यांमध्ये सोडले जात असल्याबाबत

(९) ३२८१७ (१२-०१-२०२२) श्री.गणेश नाईक (ऐरोली) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) नवी मुंबईतील औद्योगिक क्षेत्रातून कोपरखैरणे, बोनकोडे, कोपरखैरणे, बोनकोडे, कोपरी, महापे, पावणे, घणसोली, जुईनगर, नेरुळ, शिरवणे या परिसरातील नाल्यांमध्ये द्रव्ययुक्त दुषित पाणी सोडले जात असून नेलपॉलिश, गॅससदृश्य, थिनर तसेच वेगवेगळ्या स्वरुपातील उग्र वास येत असल्याने शहरातील नागरिकांना आरोग्याच्या समस्या उद्भवल्याची बाब माहे ऑक्टोंबर, २०२१ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच रासायनयुक्त दुषित पाण्याचा उग्र वास असह्य झाल्याने घणसोलीमध्ये एक महिला चक्कर येऊन खाली पडली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नवी मुंबई शहरातील जल व वायु प्रदुषण रोखण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. पर्यावरण मंत्री, मा. पर्यावरण राज्य मंत्री तसेच प्रदुषण नियंत्रण मंडळास वेळोवेळी निवेदने सादर केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त निवेदनाच्या अनुषंगाने नवी मुंबई शहरातील प्रदुषण रोखण्याकरिता शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१३-०९-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे.

माहे ऑक्टोबर, २०२१ च्या पहिल्या सप्ताहामध्ये अशा प्रकारची घटना उद्धवल्याचे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निदर्शनास आले नाही. तथापि, सप्टेंबर, २०२१ मध्ये वायु प्रदूषणासंबंधी तक्रार आली होती.

(२) वैद्यकिय आरोग्य अधिकारी, नवी मुंबई महानगरपालिका यांचे दि. १५.१२.२०२१ च्या पत्रान्वये सदर घटनेबाबत नवी मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागास कोणतीही तक्रार प्राप्त झाली नसल्याचे कळविण्यात आले आहे.

(३) होय, खरे आहे, स्थानिक लोकप्रतिनिधी यांचेकडून निवेदन प्राप्त झाले.

(४) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे ऑक्टोबर, २०२० मध्ये रात्रीच्या वेळी सर्वेक्षण करण्यासाठी गस्ती पथक स्थापन करुन ठाणे बेलापुर औदयोगीक वसाहतीमध्ये रात्रीच्या वेळी स्थानीक लोकप्रतीनिधी समवेत सर्वेक्षण करण्यात आले होते.

सदर रात्र-सर्वेक्षणा दरम्यान निर्देशनसा आलेल्या ०२ उदयोंगावर कारणे दाखवा नोटीस, ०३ उदयाेंगावर प्रस्तावित निर्देश व ०१ उद्योगावर बंदचे आदेश पारित करण्यात आलेले होते. तसचे याव्यतिरिक्त माहे जानेवारी, २०२० ते नोव्हेंबर, २०२१ या कालावधीमध्ये ४२ उद्योगांना कारणे दाखवा नोटीस, २९ उद्योगांना प्रस्तावित निर्देश व ५१ उद्योगांना बंदचे आदेश देण्यात आलेले आहेत. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दि. ३.१२.२०२१ रोजी रात्रीचे वेळी सर्वेक्षण करण्यासाठी गस्ती पथक स्थापन करण्यात आलेले आहेत.

तसेच औद्योगिक वसाहतीमधील ७० उद्योगांनी पारंपारिक इंधनाऐवजी स्वच्छ इंधन (नॅचरल गॅस) वापरण्यास सुरुवात केलेली आहे.

ठाणे-बेलापूर औद्योगिक क्षेत्रातील उद्योगातील प्रक्रियाकृत सांडपाणी सामुहिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेत वाहून नेणारी सांडपाणी वहननलिका वारंवार फुटणे/चेंबर ओव्हर फलो होणे इत्यादी बाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने कार्यकारी अभियंता, औद्योगिक विकास महामंडळ, महापे, नवी मुंबई यांना वेळोवळी पत्राद्वारे दुरुस्ती करणेबाबत व सांडपाणी नाल्यामध्ये मिसळणार नाही याबाबत दक्षता घेणेबाबत सुचित केले आहे.

तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील जिल्हा बालभवन बंद पडत असल्याबाबत

(१०) ३३२९० (१२-०१-२०२२). श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ६ ते १४ वयोगटातील मुलांची विचार श्रमता विकसित करणे व कौशल्य, आत्मविश्वास व्यक्तीमत्व इत्यादी विविध बाबी जिल्हा बालभवन योजनेमार्फत स्थानिक खाजगी संस्थेकडून राबविण्यात येत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बालभवनला देण्यात येणारे वार्षिक अनुदान हे अत्यल्प आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, बालभवन संचालकाचे मानधन, वाचनालय, खेळ, शिपायाचे मानधन, स्थानिक तज्ञ व्यक्तीचे कार्यक्रम, सहली व सांस्कृतिक कार्यक्रम आदी राबविण्यात येत आहेत हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सर्व जिल्हा बालभवनामध्ये कर्मचारी अत्यल्प मानधनावर कार्यरत रहाण्यास तयार नसल्याने व अत्यल्प मानधनामुळे जिल्हा बालभवन विद्यार्थी व कर्मचाऱ्यांच्या अभावी बंद पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती उपाययाजेना केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती वर्षा गायकवाड (२१-०६-२०२२) :(१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) हे खरे नाही.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे येथील शिक्षण आयुक्तालयाची नवीन इमारत बांधण्याबाबत

(११) ३३४१७ (१२-०१-२०२२). ॲड.अशोक पवार (शिरुर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथील शिक्षण आयुक्तालयाची नवीन इमारत बांधण्यासाठी शासनाने ६४ कोटी २४ लाख रुपये इतक्या रकमेस मान्यता दिली असल्याचा शासन निर्णय शालेय शिक्षण विभागाने दिनांक ३० सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यादरम्यान निर्गमित केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शालेय शिक्षण विभागाच्या शिवाजीनगर (पुणे) येथील प्रस्तावित नवीन इमारतीमध्ये शालेय शिक्षण विभागाची संचालनालये, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, ई-गव्हर्नन्स विभाग, शालेय पोषण आहार विभाग आणि अन्य कार्यालयाचा समावेश करण्यांत येणार असून त्याशिवाय ४०० आसन क्षमतेचे सभागृह, वाहनतळ, महत्वाच्या व्यक्तींसाठी निवास व्यवस्था आदिं सुविधांचा देखील त्यामध्ये समावेश करण्याबाबत सदर शासन निर्णयात नमूद करण्यांत आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती वर्षा गायकवाड (२९-०६-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
शासन निर्णय दिनांक ३० सप्टेंबर, २०२१ अन्वये रु. ६४ कोटी २४ लाख इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) दिनांक ६ डिसेंबर, २०२१ च्या शासन निर्णयान्वये रु.८८.३४ कोटी इतक्या सदर बांधकामाच्या ढोबळ अंदाज पत्रकास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. तसेच शासन निर्णय दिनांक ३०.३.२०२२ अन्वये शिक्षण आयुक्तालय इमारत बांधकामासाठी रुपये १० कोटी रुपये उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षणाधिकारी यांनी गैरव्यवहार केल्याबाबत

(१२) ३३६१३ (१२-०१-२०२२). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षणाधिकारी यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्याप्रकरणी माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान अटक केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती वर्षा गायकवाड (१७-०६-२०२२) : (१) नाशिक जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षणाधिकारी यांना लाचलुचपत प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केली होती, हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांना दि. २३.०८.२०२१ च्या आदेशान्वये शासन सेवेतून निलंबित करण्यात आले होते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

धुळे जिल्हा परिषदेच्या माध्यमिक विभागाच्या प्रभारी शिक्षणाधिकारी यांच्या कार्यकाळात झालेली अनियमितता

(१३) ३४१७८ (१७-०१-२०२२). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्हा परिषदेच्या माध्यमिक विभागाच्या प्रभारी शिक्षणाधिकारी यांच्या कार्यकाळातील विविध जावक क्रमांकामध्ये अनियमितता असल्याचे माहे जून, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच शासनाच्या दिनांक ४ मे, २०२० रोजी पद भरतीबाबत दिनांक १२ मे, २०२१ रोजी वा त्या दरम्यान उपसंचालक, नाशिक यांच्याकडील चौकशीचे काम पूर्ण होईपर्यंत सेवा सातत्याने देऊ नये असे पत्र असतानाही शिक्षणाधिकारी यांनी मागील तारखेचे सेवा सातत्य दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनस्तरावरुन चौकशी करुन दोषी असणाऱ्या संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी स्थानिकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती वर्षा गायकवाड (३०-०६-२०२२) : (१), (२) व (३) होय.

(४) सदर प्रकरणी शासन शुध्दीपत्रक दि. २३.८.२०१७ नुसार सर्व संबंधितांची सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्याच्या मार्गदर्शक सुचना आहेत. त्यानुषंगाने कार्यवाही करण्याच्या सूचना आयुक्त, शिक्षण कार्यालयाने शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग यांना दिल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये आरटीई कायद्यातंर्गत प्रवेश दिलेल्या मुलांची फि शासनाकडे थकीत असल्याबाबत

(१४) ३४६१७ (१७-०१-२०२२). श्री.संजय केळकर (ठाणे), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात इंग्रजी माध्यमाच्या ४० हजार शाळा असून सदर शाळांमध्ये आरटीई कायद्यातंर्गत प्रवेश दिलेल्या मुलांच्या फी चे शासनाकडे सुमार १८५० कोटी रुपये थकीत असल्याची बाब माहे जुलै, २०२१ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरटीई कायद्यांतर्गत राज्यात २५ लाख विद्यार्थ्यांना प्रवेश दिला असून विद्यार्थ्यांच्या फी ची रक्कम व केंद्र व राज्य शासन देते त्यात ६० टक्के हिस्सा केंद्रशासनाचा तर राज्याचा ४० टक्के हिस्सा आहे हे ही खरे काय,

(३) असल्यास, सन २०१७ पासून प्रति विद्यार्थी वार्षिक १७ हजार ६७० रुपये मंजूर केले असूनही शासनाने सदर रक्कम शाळांना मागील तीन वर्षापासून दिले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती वर्षा गायकवाड (२१-०६-२०२२) : (१) हे खरे नाही.

(२) अंशतः खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या वर्ग-३ च्या नोकर भरतीत अनियमितता झाली असल्याबाबत

(१५) ३४७८६ (०७-०१-२०२२). श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातील वर्ग-३ च्या नोकर भरतीत अनियमितता झाली असल्याचे माहे ऑगस्ट, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (१३-०५-२०२२) : (१) वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत प्रकल्पग्रस्तांच्या भरती प्रक्रियेच्या अनुषंगाने अनियमितता झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

(२) व (३) प्रकल्पग्रस्तांच्या भरती प्रक्रियेबाबत अपर जिल्हाधिकारी तसेच महाराष्ट्र राज्य कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांच्या स्तरावर चौकशी समिती गठित करुन याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे.

तसेच वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथील प्रकल्पग्रस्तांच्या भरती प्रक्रियेबाबतची बाब सद्यस्थितीत न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर जिल्ह्यातील सिकलसेल रूग्णांना शासनाकडून वैद्यकिय उपचाराकरिता मोफत एस. टी. प्रवासाची सवलत मिळण्याबाबत

(१६) ३४९९१ (१२-०१-२०२२) श्री.राजु पारवे (उमरेड) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील सिकलसेल रूग्णांना शासनाकडून वैद्यकिय उपचाराकरिता मोफत एस. टी. प्रवासाची सवलत देण्याबाबत शासन विचाराधिन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जास्तीत जास्त सिकलसेल रूग्ण हे गरीब कुटूंबातील असल्यामुळे त्यांना वारंवार उपचाराकरिता नागपूर येथे जावे लागत असल्याने प्रवास खर्च परवडत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. अनिल परब (२२-०६-२०२२): (१) शासन निर्णय क्र.एसटीसी-१०१७/प्र.क्र.५२५/परि-१, दि.०९ ऑक्टोबर,२०१८अन्वये सिलसेल ग्रस्त रुग्णांना रा.प.महामंडळाच्या साधी बस प्रवास भाडयात १००% सवलत अनुज्ञेय करण्यात आली आहे.

(२) नागपूर जिल्यातील सिलसेल रुग्णांना वैद्यकीय उपचाराकरीता मोफत एस.टी प्रवासाची सवलत सद्यस्थितीत सुरु आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

मच्छिमारांना कर्जमाफी देण्याबाबत

(१७) ३५०२४ (०६-०१-२०२२). श्री.भास्कर जाधव (गुहागर) : सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयांच्या विकासाबाबत मा. मुख्यमंत्री यांनी दिनांक १८ फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधदुर्ग येथे बैठक घेतली असता उक्त बैठकीत शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या कर्जमाफीच्या धर्तीवर मच्छिमारांना कर्जमाफी देण्याबाबत मच्छिमारांचे सर्वेक्षण करून अहवाल सादर करण्याची सूचना मा. मुख्यमंत्री यांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, मच्छिमारांच्या प्रश्नांचा अभ्यास आणि मत्स्यदुष्काळाचे निकष ठरविण्यासाठी समिती नेमण्याची घोषणा मा.मत्स्यव्यवसाय मंत्री यांनी दिनांक २७ फेब्रुवारी २०२० रोजी वा त्यासुमारास केली असून उक्त समिती चार महिन्यात शासनाला अहवाल सादर करुन त्यातील शिफारशींच्या अनुषंगाने मच्छिमारांना आर्थिक सहाय्य करण्यात येईल असे मा.मत्स्यव्यवसाय मंत्री यांनी जाहीर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्या अनुषंगाने मच्छिमारांचे सर्वेक्षण करुन उक्त अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,त्यात कोणत्या शिफारशी करण्यात आल्या आहेत आणि त्यानुसार मच्छिमारांना कर्जमाफीसह आर्थिक सहाय्य देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अस्लम शेख (३१-०५-२०२२) : (१) अंशत: खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) कोकण किनारपट्टीवर मत्स्य दुष्काळ परिस्थिती होती किंवा कसे याचा अभ्यास करण्यासाठी शासन निर्णय दि. ९/१२/२०२० अन्वये समिती गठीत करण्यात आलेली असून त्याअनुषंगाने कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

आदिवासी विकास महामंडळातर्फे दूर अंतरावरील गिरणीमध्ये भात भरडोई केल्याने शासनाचे झालेले नुकसान

(१८) ३५०५९ (१२-०१-२०२२). श्री.दौलत दरोडा (शहापूर) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास महामंडळातर्फे आधारभूत भात खरेदी योजनेत जवळच्या भात गिरणीमध्ये भरडाई करण्याऐवजी दूर अंतरावरील गिरणीमध्ये भात पाठविल्याने शासनाला किमान दोन कोटी रुपयांचा भूर्दंड पडल्याप्रकरणी चौकशी करण्याचे आदेश अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षक विभागाने राज्याच्या आदिवासी विकास महामंडळाला माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान दिलेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय निष्पन्न झाले,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दुर अंतरावरील गिरणीमध्ये भात पाठविण्याऱ्या संबधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रविंद्र चव्हाण (१४-०९-२०२२) :(१) हे खरे आहे.

सदर प्रकरणी महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्या., नाशिक यांचे क्र.आविम/विप/आखयो/चौकशी/२२६८/२१, दि.२९ ऑक्टोबर, २०२१ नुसार चौकशीचे आदेश देण्यात आले होते.

(२) तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी समितीने दस्तावेज तपासणी केली असता, अपहार अथवा गैरव्यवहार झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत नसल्याचे चौकशी अहवालात नमूद केले आहे.
(३) धान भरडाई वाहतुकीसाठी धानाचे डि.ओ. देताना स्थानिक परिस्थिती व धान साठवणूक केलेल्या गोदामाचे व राईसमिलचे अंतर/भरडाईची क्षमता याबाबत विचार करुन धानाचे डि.ओ. निर्गमित करण्यात आल्याचे प्रथमदर्शनी दिसून आल्याचे चौकशी अहवालात नमूद केले आहे. त्यामुळे कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

सर्वाधिक ई - कचरा महाराष्ट्रात निघत असल्याबाबत

(१९) ३५३४८ (१७-०१-२०२२). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देशात सर्वाधिक “ई” कचरा राज्यात निर्माण होत असून त्यातील ९० टक्क्याहून अधिक कचरा असंघटित क्षेत्राकडून हाताळला जातो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे शासनाने या “ई” कचऱ्याचा पुनर्वापर आणि जबाबदारी घेण्यासाठी प्रोत्साहन देणारे धोरण आखण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. आदित्य ठाकरे (२०-०६-२०२२) :(१) अंशत: हे खरे आहे.
(२) औद्योगिक आस्थापनांमध्ये निर्माण होणाऱ्या ई-कचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्याबाबत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून देण्यात येणाऱ्या संमतीपत्रामध्ये अटी व शर्ती विहीत करण्यात येतात.
(३) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून विविध प्रसिध्दी माध्यमांव्दारे जनजागृती करण्यात येते.

विर्दभात सर्पदंशाच्या वाढलेल्या घटनांबाबत

(२०) ३५४५९ (११-०१-२०२२). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भात सर्पदंशाच्या घटना नियमितपणे घडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) सर्पदंशाने मृत्यू होण्याच्या प्रमाणाच्या बाबतीत देशात महाराष्ट्राचा दुसरा क्रमांक लागतो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सर्पदंशाने मृत्यू होणाऱ्या शेतकरी किंवा आदिवासी बांधवांना शासकीय मदत देण्यासंदर्भात शासन विचाराधीन आहे काय,
(४) राज्यात सर्पमित्रांकडून मोठ्या प्रमाणात जनजागृतीचे काम करण्यात येत आहे अशा सर्व सर्पमित्रांना एकत्रीत करून सापांबद्दल जनजागृती करण्यासाठी विशेष अभियान राबविण्यासाठी शासन विचाराधीन आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

श्री. उद्धव ठाकरे (२८-०६-२०२२) : (१) व (२) विदर्भात सर्पदशांच्या अनेक घटना घडत असतात. तथापि यापैकी बहुतेक घटना या वनक्षेत्राबाहेर घडतात तसेच सर्पदंशामुळे होणारे मृत्युच्या घटनांमध्ये नुकसान भरपाई विभागामार्फत देण्यात येत नसल्यामुळे याबाबत माहिती संकलीत करणे शक्य होत नाही.
(३) सर्पदंशामुळे व्यक्तीचा मृत्यु झाल्यास, अपगंत्व आल्यास किंवा जखमी झाल्यास अर्थसहाय्य देण्याची तरतुद प्रचलित शासन निर्णयात नसल्याने संबंधितास अर्थसहाय्य देण्यात येत नाही.

तथापि, राज्यात शेती व्यवसाय करीत असताना बऱ्याचा शेतक-यांचा सर्पदंशामुळे मृत्यू ओढवतो किंवा काहींना अपंगत्व येते. अशा अपघातग्रस्त शेतक-यांस/ त्याच्या कुटुंबास आर्थिक लाभ देण्याकरिता सन २०१५-१६ पासून कृषि

विभागामार्फत गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना राज्यात सुरू करण्यात आली आहे.

(४) राज्यात वन्यजीव सप्ताह, जागतिक वन दिन जागतिक पर्यावरण दिन
वन विभागामार्फत साजरे करण्यात येतात. त्यादरम्यान कार्यक्रमाद्वारे सर्पमित्रांकडून व वन विभागाकडून सर्पदंशानंतर करावयाचे उपचार व प्रति सर्पविष उपलब्धतेबाबत जनजागृतीचे काम करण्यात येते.
(५) प्रश्न उदभवत नाही.

शाश्वत वृक्षारोपण व संवर्धनासाठी दहावी व बारावी परीक्षेमध्ये गुणदान योजना प्रस्तावित करणेबाबत

(२१) ३५५७२ (१७-०१-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शालेय शिक्षण विभागाने कला व क्रिडा यामध्ये प्रोत्साहन मिळावे यासाठी दहावी व बारावी परीक्षेसाठी ०५ ते २५ गुणांची तरतुद केली आहे म्हणून हजारो विद्यार्थी चित्रकला, संगित, शास्त्रीय संगित, लोककला, गायन, वादन व क्रीडा विषयात भाग घेवून दहावी व बारावीतील वाढीव गुणांचे लाभार्थी ठरत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दहावी व बारावी परीक्षेमध्ये शाश्वत वृक्षारोपण व संवर्धनासाठी केवळ ०३ ते ०७ गुणांची योजना घोषित केली आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, पर्यावरण हितासाठी वरील योजनेबाबत सकारात्मक निर्णय घेऊन त्वरित शासन निर्णय निर्गमित करावा व सदर योजना प्रभावी पणे राबवण्याबाबत शिक्षण मंत्री यांच्याकडे दिनांक १० ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली होती, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती वर्षा गायकवाड (२०-०६-२०२२) : (१) होय.
(२) नाही.
(३) होय.
(४) यासंदर्भात महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या सक्षम समितीमध्ये झालेल्या निर्णयानुसार राज्य मंडळाने दि.०७.०२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये महसूल व वन विभागाकडून तपशिलवार माहिती मागविली आहे. महसूल व वन विभागाकडून सदर माहिती प्राप्त झाल्यावर याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

शहरी भागातील बांधकाम क्षेत्र विस्तारल्याने मुंबईच्या तापमानात वाढ झाल्याबाबत

(२२) ३५७५९ (१२-०१-२०२२). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.शिरीष चौधरी (रावेर) : सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी दिल्ली येथील जामिया मिलीया इस्लामिया विद्यापीठ व अन्य विद्यापीठांच्या अभ्यासकांचा "अर्बन हिट आयलँड डायनामिक्स इन रिस्पोन्स टू लँड-युज/लँड कव्हर चेंज इन द कॅपिटल सिटी ऑफ मुंबई" हा शोध निबंध इंडियन रीमोट सेन्सींग जर्नल या पियर रीव्ह्यू जर्नलमधे प्रकाशित झाला असून यात मुंबईत सन १९९१ ते सन २०१८ या काळात बांधकाम क्षेत्र विस्तारल्यामुळे ८१% मोकळ्या जागा, ४०% हरित आच्छादने आणि सुमारे ३०% जल क्षेत्राचा समावेश असल्याचे नमूद केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कालावधीत बांधकाम क्षेत्रात ६६% टक्क्यांनी वाढ झाल्यामुळे मुंबईच्या तापमानात वाढ झाल्याचा निष्कर्ष या शोध निबंधात नमुद केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निदर्शनास आले व त्यानुषंगाने

मुंबईच्या तापमानातील वाढ रोखण्यासंदर्भात कोणती कार्यवाही/उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. आदित्य ठाकरे (२०-०६-२०२२) :(१) संबंधित शोध निबंध विभागास प्राप्त नाही. तथापि, गुगलच्या माध्यमातून (academia.edu) हया संकेतस्थळावर सदर शोध निबंध उपलब्ध असून, शोध निबंधामध्ये मुंबईत सन १९९१ ते सन २०१८ या काळात बांधकाम क्षेत्र विस्तारल्यामुळे ४१.९३% मोकळया जागा, ४०% हरित आच्छादने आणि ३०% जल क्षेत्राचा समावेश आहे असे नमूद असल्याचे निदर्शनास आले.
(२) सदर शोध निबंधात असा निष्कर्ष निदर्शनास आला नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

दौंड तालुक्यातील (जि. पुणे) शिक्षकांची अनेक पदे रिक्त असल्याबाबत

(२३) ३५७७६ (१७-०१-२०२२). ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दौंड तालुक्यातील पंचायत समिती शिक्षण विभाग अंतर्गत विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक व पदवीधर शिक्षक अशी सुमारे ४० पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त पदे भरण्याबाबत गटशिक्षण अधिकारी यांनी मागणी केली आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शिक्षक भरतीच बोगस असल्याने भरती केलेल्या शिक्षकांबाबत शासनाने
कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिपक केसरकर (०७-०७-२०२२) :(१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) रिक्त शिक्षक पदांवर उमेदवार निवडीची कार्यवाही पवित्र प्रणाली मार्फत पारदर्शक पध्दतीने सुरू आहे
(४) प्रश्न उद्भवत नाही.

शासकीय उपजिल्हा रुग्णालयासमोरील चांदवड-लासलगाव-विंचूर-प्रकाशा (ता.चांदवड,जि.नाशिक) राज्यमार्गावर खड्डे पडल्याबाबत

(२४) ३५८०९ (११-०१-२०२२). डॉ.राहूल आहेर (चांदवड) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्यातील चांदवड तालुक्यातील शासकीय उपजिल्हा रुग्णालयासमोरील चांदवड-लासलगाव-विंचूर-प्रकाशा (ता.चांदवड, जि.नाशिक) राज्यमार्गावर
खड्डे पडल्याने वाहनचालकांना जीवघेणा प्रवास करावा लागत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खड्डे चुकविण्यासाठी चालक रस्त्याच्या कडेने वाहन चालवत असल्याने अपघातात वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू रस्त्याची दुरूस्ती करून अपघात टाळण्याची मागणी प्रवाशी व नागरिकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू रस्ता दुरुस्त करण्याबाबत शासन काय कार्यवाही करीत आहे वा करणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अशोक चव्हाण (२४-०६-२०२२) : (१) हे खरे नाही.

चांदवड ते लासलगांव फाटा राष्ट्रीय महामार्ग असून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित (MSRDC) यांच्या अखत्यारित आहे. लासलगाव फाटा ते विंचुर रस्ता राज्यमार्ग असून सा.बां.विभागाच्या अखत्यारित येतो. सदर रस्त्यावरील दुरुस्ती वेळोवेळी करण्यात आली असून, रस्ता वाहतुकीकरिता सुस्थितीत आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे

(४) चांदवड ते मनमाड रा.मा. क्र.७५२ जी कि.मी.१०४/६०० ते १२८/६५० या रस्त्याचे कॉंक्रीटीकरणाचे काम MSRDC मार्फत प्रगतीत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

रत्नागिरी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागातील केंद्रप्रमुखांची पदे रिक्त असल्याबाबत

(२५) ३६१६९ (१७-०१-२०२२). श्री.राजन साळवी (राजापूर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागातील केंद्र प्रमुखांची १२२ पदे रिक्त असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हयात केंद्रप्रमुखाची २५१ पदे मंजूर असून १२९ पदे कार्यरत आहेत तसेच १२२ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री दिपक केसरकर (१२-०७-२०२२): (१) व (२) अंशत: खरे आहे, माहे नोव्हेंबर, २०२१ अखेर रत्नागिरी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाअंतर्गत जिल्ह्यात केंद्रप्रमुखांच्या एकूण २५१ मंजूर पदांपैकी १०६ पदे कार्यरत असून १४५ पदे रिक्त अहेत.

(३) केंद्रप्रमुखांच्या भरतीच्या प्रमाणात बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असून त्यानुसार रिक्त पदे भरण्याची तजवीज ठेवली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईसह राज्यातील उबेर इंडिया व ओला या कंपन्या शासनाच्या संमतीशिवाय प्रवाशांना वाहतुक सेवा अनधिकृतपणे उपलब्ध करुन देत असल्याबाबत

(२६) ३८५४८ (०९-०४-२०२२). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यात महाराष्ट्र सिटीटॅक्सी अधिनियमांतर्गत ॲप अ ाधारीत टॅक्सी सेवा देणाऱ्या कंपन्यांना शहरात वाहन चालविण्यासाठी बंधनकारक असलेला आवश्यक परवाना उबेर इंडिया, ओला आदि कंपन्यांच्या टॅक्सी तसेच दादर येथील बहुतांश टॅक्सीचालकांकडे बॅच किंवा परमिट नसल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईसह राज्यात ॲप आधारीत टॅक्सी सेवा देणाऱ्या उबेर इंडिया व ओला यासह एकूण किती कंपन्या

शासनाच्या आवश्यक त्या परवानग्या न घेता व किती कालावधीपासून प्रवाशांना वाहतुक सेवा उपलब्ध करुन देत आहेत, त्यामुळे शासनाचे किती आर्थिक महसुलाचे नुकसान झालेले आहे,
(३) असल्यास, केंद्र शासनाच्या २०२० च्या मार्गदर्शक तत्वाच्या आधारे तयार केलेल्या महाराष्ट्र रेग्युलेशन ऑफ ॲग्रीगेटर्स रुल्स-२०२१ च्या मसूद्याला अद्याप शासनाने मंजुरी न देण्याची व यासाठी होणाऱ्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच याबाबत २०२१ च्या नियमांना त्वरीत अंतिम मंजुरी देऊन ते तात्काळ अंमलात आणण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. अनिल परब (२२-०६-२०२२) : (१) होय.
दि.१२.०१.२०२२ रोजी दैनिक लोकसत्तामध्ये "आवश्यक परवान्याविनाच उबर इंडिया ची मुंबईत सेवा" व दैनिक लोकमतमध्ये "ॲपवरील टॅक्सींना तूर्त केंद्राचे नियम बंधनकारक, राज्य सरकारचे उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र" या शिर्षकाची बातमी प्रसिध्द झाली आहे.
(२) महाराष्ट्र राज्यात ॲप आधारीत टॅक्सी सेवा देण्यासाठी परवानगी देण्याचे धोरण दिनांक ०९.०३.२०२२ रोजी लागू करण्यात आले आहे
(३) जनहित याचिका (एल) क्र.९७७५/२०२० मध्ये दिनांक ०७.०३.२०२२ रोजी मा.उच्च न्यायालयाने आदेशीत केल्याप्रमाणे Maharashtra Regulation of the Aggregators Rules, २०२१ अस्तित्वात येण्यापूर्वी तात्पुरत्या स्वरुपात (Provisional License) ॲप बेस्ड वाहनांसाठी परवानगी देण्याच्या अनुषंगाने सक्षम प्राधिकारी व अपिलीय प्राधिकारी (Competent Authority and Appellate Authority) घोषित करण्याची अधिसूचना दि. ०९.०३.२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यानुसार मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम ९३ मधील तरतुदी, केंद्र शासनाच्या दिनांक २७.११.२०२० मधील मार्गदर्शक सूचना तसेच मा. उच्च न्यायालयाचे दिनांक ०७.०३.२०२२ रोजी दिलेल्या निर्देशानुसार व उक्त शासन अधिसूचनेच्या अधिन राहून समुच्चयकांना अनुज्ञप्ती जारी करण्याची कार्यवाही करण्यात येत असून तात्पुरती अनुज्ञप्ती (Provisional License) ३० दिवसाच्या मुदतीकरीता असून एकूण १७ समुच्च्यकांना अनुज्ञप्ती जारी करण्यात आली आहे. केंद्र शासनाच्या २०२० च्या मार्गदर्शक तत्वाच्या आधारे तयार केलेल्या महाराष्ट्र रेग्युलेशन ऑफ ॲग्रीगेटर्स रुल्स-२०२१ च्या मसुद्याला मान्यता देण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील धारावी पुनर्विकास प्रकल्पातील सेक्टर पाचच्या कामाबाबत

(२७) ३८५८२ (२८-०३-२०२२). कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील धारावी पुनर्विकास प्रकल्पातील सेक्टर पाच येथील काम शासनाने ऐनवेळी म्हाडाकडून काढून घेतले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकल्पातील पथदर्शी इमारतीचे काम म्हाडाने पूर्ण करून काही धारावीकरांचे इमारतीमध्ये राहण्याचे स्वप्न पूर्ण केले आहे व यासाठी म्हाडाचा तब्बल १२८ कोटींचा निधी खर्चित झाला असून हा खर्च परत मिळवण्यासाठी आता सेक्टर ५ मधील म्हाडाच्या जागेवर बांधकाम करण्यास परवानगी द्यावी अशी मागणी म्हाडाने गृहनिर्माण विभागाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू सेक्टर ५ चे काम शासनाने म्हाडाकडून काढून घेणे व म्हाडाच्या जागेवर बांधकाम करण्यास परवानगी न देण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनानी चौकशी केली आहे काय तदनुसार शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा

करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. जितेंद्र आव्हाड (२६-०६-२०२२) : (१) गृहनिर्माण विभाग, शासन निर्णय दिनांक ०५.११.२०१८ अन्वये धारावी मधील क्र. ५ च्या संदर्भात म्हाडास सोपविण्यात आलेली पुनर्विकासाची जबाबदारी धारावी पुनर्विकास प्रकल्पाकडे वर्ग करण्यात आलेली आहे.
(२) हे खरे आहे.
(३) (४) व (५) शासन निर्णय दि.०५.११.२०१८ अन्वये धारावी पुनर्वसन प्रकल्पातील सर्व सेक्टरचा एकत्रित विकास करण्याच्या उद्देशाने सदर पुनर्विकास विशेष हेतू कंपनीच्या माध्यमातून करण्याचे प्रस्तावित आहे. त्यामुळे शासन पत्र, गृहनिर्माण विभाग, दि. २१ मे, २०११ अन्वये महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा,निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ च्या कलम ३K अंतर्गत देण्यात आलेले निर्देश रद्द करण्यात आले. सेक्टर ५ च्या संदर्भात महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणास सोपविण्यात आलेल्या अंमलबजावणीची जबाबदारी धारावी पुनर्विकास प्रकल्पामध्ये वर्ग करण्यात आली आहे.

भुसावळच्या स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मोटारी बाबत

(२८) ३९४२७ (०९-०४-२०२२). श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भुसावळचे स्थानिक लोकप्रतिनिधींच्या यांच्या नावावर असलेली इनोव्हा कार (MH १९ CZ ५१३०) राज्याचे मा.परिवहन मंत्री यांच्या नावावर जळगाव आरटीओ कार्यालयातून परस्पर हस्तांतरीत झाल्याचे माहे जानेवारी, २०२२ च्या पहिल्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाहन ट्रान्सफर अर्जावर आरटीओ कार्यालयातील ३ लिपिक व सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या स्वाक्षरी असल्याने याबाबत दिनांक १३ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा.गृहमंत्री यांना निवेदन देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी प्रश्न भाग १ व २ नुसार चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषी आढळणा-या व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२१-०९-२०२२) :(१) होय.
(२) होय.
(३) याप्रकरणी दोषी असणारे सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी व संबंधित चार लिपिकवर्गीय कर्मचारी यांना निलंबित करण्यात आले असून महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ च्या अन्वये एकत्रित विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर येथील बाळासाहेब ठाकरे गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणीसंग्रहालयात गोंडवाना थीम पार्क उभारण्याबाबत

(२९) ३९४३५ (१८-०४-२०२२). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथे आदिवासी समाजाच्या अस्मितेचे केंद्र असलेल्या बाळासाहेब ठाकरे गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणीसंग्रहालयात गोंडवाना थिम पार्क उभारण्याची घोषणा मा. मुख्यमंत्री यांनी दिनांक २६ जानेवारी, २०२० रोजी वा

त्यासुमारास केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गोंडवाना थिम पार्कसाठी सुमारे २० हेक्टर जागा उपलब्ध करुन देण्यात यावी तसेच प्राणीसंग्रहालयाच्या नावात गोंडवानाचा उल्लेख असावा, या दोन्ही प्रकल्पात स्थायी, अस्थायी, कंत्राटी पध्दतीने आदिवासी बांधवांची निवड करावी, गोंडवाना थिम पार्क समितीत दोन आदिवासी सदस्यांएवेजी पाच आदिवासी सदस्यांची निवड करावी, या पार्कमध्ये आदिवासी बांधवांकरिता सांस्कृतिक, सामाजिक व धार्मिक उत्सव पार पाडण्याची मुभा असावी, आदिवासी बांधवांना प्रवेश तिकाटांमध्ये ५० टक्के सवलत द्यावी, इत्यादी मागण्या आदिवासी बांधवानी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गोंडवाना थिम पार्क लवकरात लवकर उभारण्याबाबत तसेच आदिवासी बांधवांनी केलेल्या मागण्या मान्य करण्याबाबात कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. उद्धव ठाकरे (२८-०६-२०२२) : (१) दिनांक २६ जानेवारी, २०२१ रोजी नागपूर येथिल बाळासाहेब ठाकरे आंतरराष्ट्रीय प्राणी उद्यानाच्या उद्घाटन प्रसंगी सदर प्राणी उद्यानाचे परिसरात आदिवासी थीम पार्क उभारण्याबाबतची घोषणा मा. मुख्यमंत्री महोदयांनी केली हे खरे आहे.
(२) होय हे खरे आहे.
(३) सदरचा प्रकल्प हा मुख्यत: प्राणी उद्यान विकसीत करण्याबाबत आहे. गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणी उद्यानाचे केंद्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरणाकडून मंजूर संकल्प आराखड्यानुसार २.०० हेक्टर क्षेत्रावर Tribal Trail विकसित करणे अंतर्भुत आहे. Tribal Trail / गोंडवाना थीम पार्क बाबतीत आदिवासी समाजाची मागणी विचारात घेऊन आणि मंजूर आराखडयातील इतर घटकांचा विकास करण्याच्या अनुषंगाने बदल करुन त्यास केंद्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरण, नवी दिल्ली यांची मान्यता घेण्याची कार्यवाही एफडीसीएम, लि. मार्फत सुरू आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

२७ गावानां गॅव्हीटीने पाणी पुरवठा करण्याबाबत

(३०) ३९६१२ (११-०४-२०२२). श्री.भास्कर जाधव (गुहागर) : तारांकित प्रश्न क्रमांक ३५०२७ ला दिनांक २७ डिसेंबर, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मे. मॉडर्न सर्व्हे कन्सल्टन्सी, पुणे यांनी केलेल्या सर्व्हेक्षणानुसार रत्नागिरी जिल्हयातील कोळकेवाडी (ता. चिपळूण) धरणाच्या आऊटलेटमधून २४ ग्रामपंचायतींमधील २७ गावांना ग्रॅव्हीटीने पाणी देणे शक्य आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत चिपळूण तालुक्यातील मौजे पिंपळी बुद्रुक, तिवरे, रिक्टोली, आकले, कादवड, दादर, कळकवणे या तीव्र टंचाईग्रस्त असलेल्या परिसरातील गावांचा समावेश करण्यात यावा, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २२ जानेवारी २०२२ रोजी वा त्यासुमारास दिलेल्या पत्रान्वये केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्नुषंगाने उक्त गावांचा समावेश करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. गुलाबराव पाटील (१६-०८-२०२२) : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) संबंधित लोकप्रतिनिधी यांनी मागणी केलेल्या ७ गावांपैकी दादर व कळकवणे या गावांचा कळकवणे - वालोटी प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेमध्ये समावेश करण्यात आला असून या योजनेस शासनाच्या दि.२७.०४.२०२२ रोजीच्या

शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे व निविदा प्रक्रियेची कार्यवाही सुरु आहे.

उर्वरित तिवरे, रिक्टोली, आकले, कादवड, पिंपळी बु. या गावांकरीता केलेल्या सर्वेक्षणांअंती तिवरे, रिक्टोली, आकले, कादवड या गावात गुरुत्वीय बलाने पाणी जात नसल्याने अशी गावे वगळून पिंपळी बु. गावासह अन्य २५ गावांसाठीच्या योजनेस मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे यांनी दि.२९.०७.२०२२ अन्वये तांत्रिक मान्यता प्रदान केली असून प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

जिल्हा परिषदेतील उच्च शिक्षित, उच्चविद्याविभूषित एम.एड.अर्हता धारक प्राथमिक शिक्षकांना सेवाज्येष्ठते नुसार पदोनती मिळण्याबाबत

(३१) ३९७७१ (०९-०४-२०२२). डॉ.संदीप धुर्वे (अर्णी) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ (सन १९६२) महाराष्ट्र अधिनियम क्रमांक पाच याचे कलम २७४ पोटकलम (२) खंड (३९) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र शासनाने उक्त कलम २७४ पोटकलम (३) अन्वये महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम,१९६७ तयार केला हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यात परिशिष्ट चार मध्ये जिल्हा परिषदेतील माध्यमिक शिक्षक जिल्हा तांत्रिक सेवेत आणि प्राथमिक शिक्षक जिल्हा सेवा (अतांत्रिक) दाखविले आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, माध्यमिक शिक्षकाची शैक्षणिक अर्हता विषयातील पदवी, बी.एड असल्यामुळे ते सेवाजेष्ठतेने, विभागीय परिक्षेद्वारे गटशिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी,शिक्षणाधिकारी होतात हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जिल्हा परिषदेतील प्राथमिक शिक्षकांनीही सेवेत राहून माध्यमिक शिक्षकांच्या बरोबरीने किंवा त्यापेक्षाही शैक्षणिक अर्हता अथक परिश्रमाने एम.एड. ही शिक्षणशास्त्रातील सर्वोच्च पदवी धारण केलेली आहे. असे शिक्षक गटशिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी पदासाठी असलेली सेवाअंतर्गत परीक्षा देऊ शकतात हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, जिल्हा परिषदेतील प्राथमिक शिक्षकाच्या उच्च शैक्षणिक अर्हतेचा उपयोग शिक्षण विभागातील प्रशासन शाखेसाठी करुन घेता येईल किंवा यासंबंधाने सेवा नियमात दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती वर्षा गायकवाड (२०-०६-२०२२) : (१) खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) उपशिक्षणाधिकारी व तत्सम पदांच्या सेवाप्रवेश नियमात निम्न संवर्गात माध्यमिक शिक्षक पदाचा समावेश असल्याने ते उपशिक्षणाधिकारी / गटशिक्षणाधिकारी पदावर सेवा ज्येष्ठतेनुसार पदोन्नतीस पात्र होतात.

(४) उपशिक्षणाधिकारी व तत्सम पदांच्या सेवाप्रवेश नियमात अशी तरतूद नाही.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

जवळाबाजार (जि. हिंगोली) येथे झालेली वृक्षतोड व वन्यप्राण्यांनी केलेली पिकांची नासाडी

(३२) ३९९७९ (३०-०३-२०२२). श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यातील जवळाबाजार परिसरात मोठ्या प्रमाणात वृक्षतोड व तसेच शेतीशिवारातीथ डुक्कर, हरण व

वानरांचा वापर वाढल्याने वन्यप्राण्यांकडून मागील काही महिन्यांपासून पीके नष्ट करण्यांत येत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तेथील शेतकऱ्यांनी संबंधित वनअधिकाऱ्यांकडे पिकांच्या नुकसानीबाबत तक्रारी केल्यानंतर वन अधिकारी त्याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे दिनांक १९ जानेवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पिकांच्या नुकसानीबाबत शेतकऱ्यांना तुटपूंजी मदत देण्याऐवजी वन्य प्राण्यांच्या वाढत असलेल्या संख्येवर आळा घालण्यासाठी सदर प्राणी पकडून वनखात्याने जंगलात पाठविण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी लोकप्रतिनिधींकडून व शेतकरी वर्गाकडून होत असल्याने याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत

श्री. उद्धव ठाकरे (२८-०६-२०२२) : (१) व (२) हे खरे नाही.
जवळा बाजार परिसरात अवैध वृक्षतोड झाल्याची कुठलीही घटना निदर्शनास आलेली नाही. तथापि दिनांक २३.१२.२०२१ रोजी वन्यप्राण्यांनी शेतपिकाचे नुकसान केल्याचा अर्ज प्राप्त झाला होता. प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार प्रत्यक्ष पाहणी करुन पिक नुकसानीचा पंचनामा नोंदविण्यात आला असून सदर अर्जदारास काही त्रुटींची पूर्तता करण्यास कळविण्यात आले होते. तथापि अद्याप अर्जदाराकडुन सदर त्रुटींची पूर्तता करण्यात आलेली नाही. त्यामुळे नुकसान भरपाईपोटी अर्थसहाय्य अदा करण्यात आलेले नाही.
(३) शेतपिकांचे नुकसान घटनांवर होण्याच्या आळा घालण्यासाठी व वन्यप्राणी वनेत्तर क्षेत्रात येऊ नये याकरिता वन विभागामार्फत उपाययोजना करण्यात येतात:-
• वन्यप्राण्यांना वनक्षेत्रात पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे म्हणून कुत्रिम पाणवठे तयार करुन पाण्याची व्यवस्था करण्यात येते.
• जंगल क्षेत्राच्या बाजूस आवश्यकतेनुसार वन्यप्राणी प्रतिबंधक चर खोदण्यात येतात.
• वनक्षेत्रात तसेच वन्यप्राणी प्रवण क्षेत्रात वनकर्मचाऱ्यांमार्फत नियमित गस्त करण्यात येते.
• वनक्षेत्रात कॅमेरा ट्रॅप लावून वन्यप्राण्यांच्या हालचालीवर नियंत्रण ठेवण्यात येते.
• वनक्षेत्रा सभोवतालच्या गावांमधे मानव-वन्यप्राणी संघर्ष उदभवल्यास करावयाच्या उपायोजनांबाबत स्थानिकांमध्ये जनजागृती करण्यात येते.
(४) प्रश्न उदभवत नाही.

मोहोळ बसस्थानक इतरत्र स्थलांतरीत करण्याबाबत

(३३) ४०७५२ (०९-०४-२०२२). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोहोळ-पंढरपूर व मुंबई हैद्राबाद (जि.सोलापूर) या राष्ट्रीय महामार्गासाठी मोहोळ बसस्थानकाची जागा घेतल्याने बसस्थानकाची जागा कमी होऊन गैरसोय होत असल्याने सदर आगार इतरत्र प्रशस्त जागेत स्थलांतरित करण्याची मागणी संघटना व नागरिकांकडून होत असल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रस्तुत बस स्थानकास इतरत्र जागा देण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. अनिल परब (०९-०६-२०२२) : (१) होय, महाराष्ट्र राज्य जनहित शेतकरी संघटना यांच्याकडुन दि.२१.०१.२०२२ रोजी बसस्थानकाची जागा स्थलांतरित करुन नवीन बसस्थानक बांधणेबाबत मागणी प्राप्त झालेली आहे.
(२) प्रारुप विकास योजना अंतर्गत मोहोळ नगर परिषद, जिल्हा सोलापूर येथे रा.प.महामंडळासाठी १ हेक्टर जागा विनामुल्य आरक्षित करण्याकरीता सहायक संचालक नगर रचना आणि मुल्य निर्धारण विभाग व जिल्हाधिकारी, सोलापूर यांना रा.प.सोलापूर विभागाकडून दि.०४.०४.२०२२ अन्वये मागणी केलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

खडकसावंगा (ता.बाभुळगाव जि.यवतमाळ) येथील बेंबळा पर्यटन केंद्राला निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

(३४) ४०८०९ (०९-०४-२०२२). डॉ.अशोक उईके (राळेगाव) : सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खडकसावंगा (ता.बाभुळगाव, जि.यवतमाळ) येथील बेंबळा प्रकल्पाच्या परिसरात पर्यटन विभागामार्फत पर्यटन केंद्र मंजूर करण्यात आले असून सदर पर्यटन केंद्रात पहिल्या टप्याअंतर्गत रस्ते, लहान मुलांना खेळण्याचे साहित्य ईत्यादी कामे करण्याकरिता निधी प्राप्त झाला असून दुस-या टप्प्यातील प्रस्तावित कामांना अद्याप निधी देण्यात आला नसल्याचे दिनांक २० जानेवारी २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पर्यटन केंद्र यवतमाळ शहरापासून जवळ असल्याने नागरीकांच्या सोईच्यादृष्टीने दुस-या टप्यामध्ये बागबगीचा, वॉटर फाउंटन, इतर रस्ते, पर्यटकांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था ईत्यादि कामे करण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दुस-या टप्प्यातील पर्यटन विकास कामांना कधी पर्यत निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. आदित्य ठाकरे (२९-०६-२०२२) : (१) अंशत: खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) बेंबळा प्रकल्पाच्या विकासाकरीता पहिल्या टप्प्याचे काम यंत्रणेकडून पूर्ण करण्यात आले असून झालेल्या कामाकरीता शासनाकडून पूर्ण निधी देण्यात आला आहे. सदर कामाच्या दुसऱ्या टप्प्याकरिता शासनाकडून रु. ३०० लक्ष एवढ्या रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. शासनाच्या दि.१२/०४/२०२१ च्या शासन निर्णयाद्वारे भाग-२ चे काम रद्द करण्यात आले असून फेर प्रस्ताव संचालक, पर्यटन संचालनालय यांच्यामार्फत सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

भिवंडी शहरातील (जि.ठाणे) नागरिकांकरिता स्वतंत्र RTO ऑफिस निर्माण करण्याबाबत

(३५) ४११७० (०९-०४-२०२२). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी शहराच्या अंतर्गत व जोडून वाहतूकीसाठी केवळ रस्ते सोयीस्कर असल्याने नागरिकांद्वारे शासकीय बसेस व खाजगी वाहनांचा वापर केला जातो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खाजगी वाहने रस्त्यावर चालविण्यासाठी संबंधित परवाने घेणे अत्यावश्यक असते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गाड्यांचे RTO चे कोणतेही काम असल्यास भिवंडीतील नागरिकांना भिवंडी बाहेर ठाणे शहरातील RTO ऑफिस मध्ये जावे लागते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, भिवंडी शहर व परिसरातील लोकसंख्या सुमारे ११ लाख इतकी असल्याने भिवंडी शहरातील

नागरिकांकरिता स्वतंत्र RTO कार्यालय निर्माण करण्यात यावे तसेच स्वतंत्र RTO ऑफिस निर्माण होईपर्यंत नागरिकांच्या सुविधांकरिता शहरामध्ये ड्रायविंग लायसन्सच्या कॅम्पचे आयोजन करण्यात यावे याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी परिवहन आयुक्त यांना दिनांक २४ नोव्हेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२१-०९-२०२२) : (१), (२) व (३) भिवंडी शहरातील नागरीकांव्दारे वाहतूकीसाठी शासकीय बसेस, खाजगी वाहने, रिक्षा, माल वाहतूक करणारी वाहने व खाजगी वाहनांचा वापर केला जातो.

भिवंडी शहर व आजूबाजूच्या परिसरातील वाहनांची व वाहन चालक अनुज्ञप्तीची संख्या लक्षात घेता, भिवंडी शहर व तालुक्यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे यांच्या कार्यालयामार्फत प्रत्येक बुधवार, गुरुवार व शुक्रवार असे ३ दिवस शिकाऊ व पक्की अनुज्ञप्ती जारी करण्याकरीता शिबिर (कॅम्प) कार्यालय भिवंडी येथे आयोजित केले जाते.

शासनाने परिवहन विभागाशी संबंधित वाहन नोंदणी, अनुज्ञप्तीसह ११५ सेवा ऑनलाईन पध्दतीने सुरु केल्या आहेत. त्यामध्ये शिकाऊ अनुज्ञप्ती, दुय्यम नोंदणी प्रमाणपत्र, कर्ज बोजा वाढविणे/कमी करणे त्याचप्रमाणे जुन्या अनुज्ञप्ती व वाहनांचे अभिलेख वाहन ४.० प्रणालीवर बॅकलॉग एन्ट्रीद्वारे घेण्यात येतात. त्यामुळे नागरिकांना परिवहन कार्यालयात/शिबिर कार्यालयात कामकाजासाठी जावे लागत नाही. मोटार वाहनांची अनुषांगिक कामे जसे व्यवसाय कर, पर्यावरण कर, जुना थकीत वाहन कर व दंड वसुली, थकीत कर वसुलीकरीता वाहनांचा लिलाव करणे, कर परतावा इ. सेवा ऑनलाईन/फेसलेस पध्दतीने उपलब्ध करण्याबाबतची बाब कार्यवाही खाली आहे.

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या निर्देशानुसार प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे कार्यालयाच्या परिक्षेत्रातील वाहनांच्या तपासणी करीता भिवंडी शहरापासून १२-१५ कि.मी. अंतरावरील मौजे नांदिवली, ता. कल्याण येथे एकूण चार ब्रेक टेस्ट ट्रॅकची उभारणी करण्यात आली असून सदर ब्रेक टेस्ट ट्रॅकवर वाहनांची तपासणी करण्यात येऊन योग्यता नूतनीकरण प्रमाणपत्र जारी करण्यात येते.
(४) होय.
(५) मोटार वाहन विभागांतर्गत नवीन प्रादेशिक/उप प्रादेशिक परिवहन कार्यालये स्थापन करणेसंदर्भातील निकष शासन निर्णय, गृह विभाग, दि. १८.०६.२०१८ अन्वये ठरविण्यात आले आहेत.

सदर निकषांनुसार एखादया जिल्हयाचे नव्याने विभाजन होऊन जिल्हा निर्मिती झाल्याच्या घटने व्यतिरिक्त इतर कोणत्याही परिस्थितीत नवीन कार्यालयाची स्थापना करण्यात येऊ नये, असा धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला आहे.

ठाणे शहराला तापमान वाढ व पूर सदृश परिस्थितीमुळे धोका असल्याबाबत

(३६) ४१३५३ (०९-०४-२०२२). श्री.संजय केळकर (ठाणे): सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे शहराला तापमान वाढ व पूर सदृश परिस्थितीमुळे धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याचे पर्यावरण सध्यस्थिती अहवालात नमुद करण्यात आल्याचे दिनांक २१ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, काँक्रिटीकरण व पेव्हर ब्लॉकचा अतिरिक्त वापर यामुळे भविष्यात ठाणे महापालिका क्षेत्राला पुराचा धोका वाढणार असल्याचे अहवालात नमुद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. आदित्य ठाकरे (२३-०६-२०२२) : (१) व (२) हे खरे नाही.
(३) जागतिक तापमान वाढव त्यानुषंगाने संभाव्य परिणामांना सामोरे जाण्यासाठी ठाणे महापालिकेने ठाणे शहरासाठी Climate Resilient City Action Plan तयार केलेला आहे.
- तसेच महाराष्ट्र शासनाच्या रेस टू झिरो या प्रकल्पामध्ये ठाणे महापालिका समाविष्ट महाराष्ट्र शासनातर्फे निर्देशीत

करण्यात आलेली आहे.
याशिवाय महानगरपालिका क्षेत्रात संभाव्य पुर परिस्थिती हाताळण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार केलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

महा करीअर पोर्टलमध्ये उर्दू भाषेचा समावेश करण्याबाबत

(३७) ४१६०५ (२८-०३-२०२२). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्यशासनाच्या महाकरीअर पोर्टल मध्ये उर्दू भाषेचा समावेश नाही हे खरे आहे काय,
(२) असल्यास महाराष्ट्र राज्य शासनाचे महाकरीअर पोर्टल मध्ये उर्दू भाषेचा समावेश करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १४ डिसेंबर २०२० रोजी वा त्या सुमारास शासनास निवेदन दिले आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास त्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती वर्षा गायकवाड (२१-०६-२०२२) :(१) व (२) हे खरे आहे.
(३) राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र,पुणे व युनिसेफ यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र राज्यातील इयत्ता ९ वी ते १२ वी च्या विद्यार्थ्यांना करिअर विषयक विविध संधी, प्रवेश परीक्षा, विविध शिष्यवृत्या, विविध विद्यापीठे
या सोबत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध संस्था विद्यापीठे यांची माहिती उपलब्ध करून देण्यासाठी महाकरिअर पोर्टल मे २०२० मध्ये सुरू करण्यात आलेले आहे. सदर पोर्टल मध्ये सद्यस्थितीमध्ये महाराष्ट्रासाठी मराठी व इंग्रजी
या दोन भाषांचा समावेश करण्यात आलेला आहे. या पोर्टलच्या विकसनासाठी महाराष्ट्र शासनामार्फत कोणत्याही प्रकारचा खर्च करण्यात आलेला नाही. सदर सुविधा युनिसेफ इंडिया यांच्यामार्फत राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे यांनी उपलब्ध करून घेतली आहे. सदर पोर्टल मध्ये उर्दू भाषेचा समावेश करण्याबाबत सदर कार्यालयाकडे आलेली निवेदने याचा विचार करता परिषदेने दि.०४.०२.२०२१ रोजी ई-मेल द्वारे युनिसेफ यांना उर्दू भाषेचा
समावेश करण्याबाबत विनंती केलेली आहे. यासोबतच दि. १५.०४.२०२१ च्या पत्रानुसार स्मरणपत्र देखील दिले आहे.
यानुसार सदर पोर्टल मध्ये उर्दू भाषेचा समावेश करण्यासाठी युनिसेफ इंडिया यांना राज्य शैक्षणिक संशोधन
व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे मार्फत विनंती करून पाठपुरावा करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागातील पदे रिक्त असल्याबाबत

(३८) ४१७१३ (०९-०४-२०२२). श्री.राजु (बाबा) जयवंतराव आवळे (हातकणंगले) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागातील दोन उपशिक्षणाधिकारी तर १२ तालुक्यातील १० ठिकाणी गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी १६, केंद्रप्रमुख १३७ पदे रिक्त असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ रोजीच्या सुमारास निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रिक्त जागा तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती वर्षा गायकवाड (२९-०६-२०२२) : (१) अंशत: खरे आहे.

(२) रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. शासन आदेश दिनांक २४.५.२०२२ अन्वये उपशिक्षणाधिकारी / गटशिक्षणाधिकारी या पदावर सरळसेवेने काही अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही

एकात्मिक बाल विकास विभाग, जिल्हा परिषद,जळगाव यांच्यामार्फत राबविण्यात येणा-या योजनेअंतर्गत झालेला गैरव्यवहार

(३९) ४१७७१ (१२-०४-२०२२). श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) एकात्मिक बाल विकास विभाग, जिल्हा परिषद, जळगाव यांच्यामार्फत जिल्हयातील अंगणवाडीमधील ६ महिने ते ६ वर्षांतील कुपोषित मुला-मुलींसाठी अतिरिक्त आहार पुरविणे अंतर्गत प्रोटीन फूड सप्लीमेट पुरविणे ही योजना सन २०१७-१८ मध्ये वा त्या दरम्यान राबविली गेली असून जिल्हयात एकूण १९ प्रकल्प अंतर्गत ३६४० अंगणवाडया असून ३०८६० लाभार्थ्यांपैकी ११८१३ लाभार्थी सदर योजनेपासून वंचित आहेत हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, सदर योजनेवर रु.१९९९, ९३५/- खर्च करण्यात आले असून खरेदी करताना ३ लाखापेक्षा जास्त खरेदी करताना ई.निविदा प्रकिया राबविण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, अंगणवाडी केंद्रांना पॅटर्न ब्लॉक सेट पुरवण्यात आले असून सन २०१७-१८ या वर्षांत रु. २४,७९,९००/- खर्च करण्यात आले असून निविदेनुसार वस्तू प्राप्त झालेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अंगणवाडयांना लागणा-या या साहित्याची खरेदी प्रक्रिया विहित पध्दतीने दरवर्षी एप्रिल महिन्यापासून सुरु करणे आवश्यक असताना खरेदी उशीरा सुरु करण्यात आली तसेच अंगणवाडीतील विद्यार्थी संख्या विचारात न घेता कमी जास्त प्रमाणात खेळणी वाटप करण्यात आली, असल्याचे निदर्शनरास आले आहे हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबबात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार यामध्ये दोषी
असणा-या संबंधितांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्रीमती यशोमती ठाकूर (१६-०६-२०२२) : (१) ०६ महिने ते ०६ वर्षातील कुपोषीत मुला/मुलींसाठी अतिरिक्त आहार पुरविणे अंतर्गत प्रोटीनफुड सप्लीमेंट पुरविणे ही योजना सन २०१७-१८ मध्ये राबविली गेली असुन जिल्यात एकुण १९ प्रकल्पांतर्गत ३६४० अंगणवाडया कार्यरत असुन सदरील अतिरिक्त पुरक आहार मंजुर निधीच्या अधिन राहुन अंगणवाडी केंद्रातील कुपोषित (SAM, MAM, SUW) बालकांना प्रकल्पस्तरावर वाटप करण्यात आलेला असुन सदर योजनांतर्गत लाभार्थी लाभापासून वंचित राहीलेले नाहीत.
(२) सदर योजनेवर रक्कम रुपये १९,९९,९३५/- इतका निधी खर्च झालेला असून सदरची खरेदी ही, मा. संचालक वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई यांच्याकडील दरकरार मंजुर असलेल्या एजन्सी कडून खरेदी करण्यात आलेली आहे.
(३) हे खरे नाही.
सन २०१७-१८ या वर्षात रुपये २४,७९,९००/- इतका निधी खर्च करण्यात आलेला असून बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचे कडील साठा नोंदवहीतील घेण्यात आलेल्या नोंदीवरुन निविदेत दर्शविल्या प्रमाणे साहित्य प्राप्त झालेले आहे.
(४) हे खरे नाही.
साहित्य खरेदीसाठी लागणारा निधीबाबत दिनांक २५/०७/२०१७ रोजी घेण्यात आलेल्या सर्वसाधारण सभेत पुनर्विनियोजनास मान्यता मिळाल्याने उशिराने खरेदी प्रक्रीया राबविण्यात आलेली आहे. तसेच एकुण अंगणवाडी केंद्र व खरेदी केलेले संच यांच्या सम प्रमाणात साहित्य वाटप करण्यात आलेले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

पोषण आहार योजने अंतर्गत आदिवासी पट्टयात शिशु आहारात दुधास पर्याय व पूरक असलेल्या उत्पादनांचा समावेश करण्याबाबत

(४०) ४१८५६ (१२-०४-२०२२). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिला व बालकल्याण विभागामार्फत राबविल्या जाणा-या पोषण आहारा योजने अंतर्गत आदिवासी पट्टयात शिशु आहार म्हणून दुधास पर्याय व पूरक असलेल्या उत्पादनांचा समावेश करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्यांचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, यामध्ये कोणकोणत्या उत्पादनांचा समावेश करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती यशोमती ठाकूर (१५-०६-२०२२) : (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

मुक्ताईनगर (जि.जळगांव) आगाराच्या व्यवस्थापकांवर निलंबनाची कारवाई होणेबाबत

(४१) ४१८६६ (०९-०४-२०२२). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुक्ताईनगर (जि.जळगांव) आगाराचे व्यवस्थापक श्री.संदिप साठे यांच्यावर तात्काळ निलंबनाची कारवाई होणेबाबत दिनांक २४ जानेवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.विभागीय नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, जळगांव यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार संबंधितांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. अनिल परब (०९-०६-२०२२) : (१) हे खरे आहे.

(२) श्री.संदीप साठे आगार व्यवस्थापक यांना क्र/राप/निस-२/अप/१०/२०२२/३० दि.२४.०२.२०२२ नुसार रितसर आरोपपत्र देण्यात आलेले असून त्यांचे विरुद्ध प्रमादिय (शिस्त आवेदन कार्यपध्दतीनुसार) कारवाई सुरु करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

हिवताप व हत्तीरोग विभागातील आरोग्य सहाय्यक व आरोग्य कर्मचारी या पदावर पदोन्नतीपात्र कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीबाबत

(४२) ४१९६२ (२४-०४-२०२२). श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.रवि राणा (बडनेरा), ॲड.राहूल कुल (दौंड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अध्यक्ष, विभागीय निवड समिती तथा उपसंचालक, आरोग्य विभाग, नागपूर यांनी विभागीय पदोन्नती निवड

समितीची दिनांक २८ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास झालेल्या बैठकीत ९७ हिवताप व हत्तीरोग आरोग्य कर्मचाऱ्यांची आरोग्य सहाय्यक या पदावर तर ४९ क्षेत्र कार्यकर्त्यांची आरोग्य कर्मचारी या पदावर पदोन्नती देण्यास मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंबंधीचे पदोन्नतीचे व पदस्थापनेचे आदेश निर्गमित होण्यास विलंब होत असल्यामुळे पदोन्नती कृती समितीमार्फत दिनांक २८ ऑक्टोबर, २०२१ रोजी पासून आमरण उपोषण करण्यात आले होते, मात्र मा.मंत्री, सार्वजनिक आरोग्य यांनी दूरध्वनीवरून कर्मचाऱ्यांना दिलेल्या आश्वासनानंतर सदर उपोषण मागे घेण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानंतर अद्यापही पदोन्नती व पदस्थापनेचे आदेश निर्गमित करण्यात आलेले नसल्यामुळे दिनांक १७ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास सदर कर्मचाऱ्यांनी पुन्हा बेमुदत आमरण उपोषण करावे लागले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, संबंधित कर्मचाऱ्यांचे पदोन्नतीचे आदेश तातडीने काढण्याबाबत विरोधी पक्ष नेता, विधानसभा यांनी दिनांक ०१ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास पत्रान्वये मा. सार्वजनिक आरोग्य मंत्री यांना विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, संबंधित पदोन्नतीपात्र कर्मचाऱ्यांचे पदोन्नती व पदस्थापनेचे आदेश तातडीने निर्गमित करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

डॉ. राजेश टोपे (२८-०६-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) हे अंशत: खरे आहे.
सार्वजनिक आरोग्य विभागाकडून सदर पदोन्नती देण्याबाबतचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाच्या मार्गदर्शनार्थ सादर करण्यात आला होता. दि.१७ जानेवारी,२०२२ पर्यंत या प्रस्तावाबाबत मान्यता सार्वजनिक आरोग्य विभागाकडे न आल्याने पदोन्नतीबाबतचे मार्गदर्शन कळविण्यात आले नाही.
(४) विरोधी पक्ष नेता ,विधानसभा यांचे दिनांक ०१ फेब्रुवारी, २०२२ रोजीचे पत्र विभागास अद्याप प्राप्त झाले नाही.
(५) दि.२९.०९.२०२१ अन्वये नियमित क्षेत्र कर्मचारी, आरोग्य निरीक्षक संवर्गाचे सेवाप्रवेशनियम सुधारित केल्यामुळे दि.२८.०९.२०२१ च्या विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीत पात्र ठरलेले बहुतांश कर्मचारी देखील पदोन्नती लाभापासून वंचित रहात आहेत. परंतु, सदर सुधारित सेवाप्रवेश नियम निर्गमित होण्यापूर्वीच सदर कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्याकरिता पदोन्नती समितीची बैठकीची कार्यवाही पूर्ण करण्यात आली होती. फक्त पदोन्नती आदेश निर्गमित करण्यात आले नव्हते. यास्तव सुधारित सेवाप्रवेश नियम निर्गमित होण्यापूर्वी पदोन्नतीकरिता पात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांना जुन्या सेवाप्रवेश नियमानुसार पदोन्नती देण्यात यावी किंवा कसे याबाबत मार्गदर्शन सामान्य प्रशासन विभागाकडे मागविले होते. त्याअनुसरून सामान्य प्रशासन विभागाने सुधारित सेवाप्रवेश नियम निर्गमित होण्यापूर्वी पदोन्नतीकरिता पात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांना जुन्या सेवाप्रवेश नियमानुसार पदोन्नती देण्यास मान्यता दिली आहे. सदर प्रकरणी पदोन्नतीचे आदेश निर्गमित करण्याच्या सूचना संबंधीत कार्यालयास दि.०४.०५.२०२२ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

इस्माईल युसुफ महाविद्यालयाच्या परिसरात शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई पश्चिम विभाग यांचे नवीन कार्यालय बांधण्याबाबत

(४३) ४२३९८ (०८-०६-२०२२). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जोगेश्वरी विधानसभा क्षेत्रातील इस्माईल युसुफ महाविद्यालयाच्या परिसरात शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई पश्चिम

विभाग यांचे कार्यालय एक मजली इमारतीमध्ये कार्यरत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कार्यालयामार्फत वांद्रे ते दहिसर या क्षेत्रातील ७९५ माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांचे काम करण्यात येत असून या कार्यालयाच्या इमारतीमध्ये माध्यमिक विभाग व भविष्य निर्वाह निधी पथक, सर्वशिक्षा अभियान विभाग, लेखाधिकारी (शिक्षण), पश्चिम विभाग मुंबई यांचीही कार्यालये स्वतंत्ररित्या कार्यरत असून या सर्व कार्यालयातील जवळपास ६२ कर्मचारी या इमारतीत काम करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सद्य:स्थितीत या इमारतीमध्ये कार्यरत असलेले कर्मचाऱ्यांची आसन व्यवस्था ही पुरेशा जागेअभावी अत्यंत दाटीवाटीची असून, कार्यालयीन कागदपत्र, नस्त्या, अभिलेख सुस्थितीत ठेवण्यास जागा नसल्याने ते इतरत्र रचून ठेवण्यात आलेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच सदरहू इमारत ही अत्यंत जीर्ण व नादुरूस्त झालेली असल्याने पावसाळयात या इमारतीच्या छतामधून पावसाचे पाणी गळत असून, इमारतीच्या भिंतीचे प्लास्टरही खराब झालेले असल्याने या कार्यालयातील सर्व दस्तऐवज, नस्ती, कागदपत्र व अभिलेख भिजून खराब होत असल्याने सदरहू ठिकाणी या इमारतीच्या बाजूच्या जागेत शिक्षण निरीक्षकांचे नविन कार्यालय बांधण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.शालेय शिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेकडे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने या ठिकाणी शिक्षण निरीक्षकरीता नवीन कार्यालय उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती वर्षा गायकवाड (२३-०६-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) होय, हे खरे आहे.
(५) सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने आयुक्त शिक्षण कार्यालयाकडून अहवाल मागविण्यात आला आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

उस्मानाबाद जिल्हा परिषदेस कायम स्वरुपी शिक्षणाधिकारी नेमण्याबाबत

(४४) ४२४४६ (०९-०४-२०२२). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद जिल्हा परिषदेंतर्गत शिक्षणाधिकारी हे पद गेल्या ३ वर्षापासून रिक्त आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उस्मानाबाद जिल्हा हा आकांक्षित जिल्हा असल्याने तेथील महत्वाच्या असलेल्या सर्वच घटकाचा चांगल्या प्रतीने विकास घडावा यासाठी जिल्ह्यातील सर्व विभागांच्या प्रमुख पदी त्या विभागास कायम अधिकारी असणे गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कायम शिक्षणाधिकाऱ्यांची नेमणूक करण्याबाबत व शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत जिल्हा परिषदेने व लोकप्रतिनिधींनी शासनाकडे वेळोवेळी मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शिक्षण व्यवस्था बळकट करण्यासाठी जिल्ह्याला कायमस्वरूपी शिक्षण अधिकारी देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती वर्षा गायकवाड (२९-०६-२०२२) : (१) व २) अंशत: खरे आहे.
(३) व (४) सदर रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक). उस्मानाबाद हे पद भरलेले असून शिक्षणाधिकारी (प्राथमिक) या पदावर शासन निर्णय दिनांक २३.२.२०२२ अन्वये पदोन्नतीने अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही

गडचिरोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी खास बाब म्हणून धान खरेदीच्या ऑनलाइन प्रिक्रियेस मुदतवाढ देणेबाबत

(४५) ४२७१४ (०९-०४-२०२२). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात धान खरेदीची सर्व प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने अत्यंत कमी वेळेत राबविली जात असून धानाचे अधिक उत्पन्न घेणाऱ्या गडचिरोली जिल्ह्यात ऑनलाईन पद्धतीने धान खरेदी केली जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गडचिरोली हा अतिदुर्गम व वन परिक्षेत्राने व्याप्त जिल्हा असल्याने या भागात इंटरनेटची योग्य सुविधा तसेच धान गोदामाची उपलब्धता नसल्यामुळे धान खरेदीच्या ऑनलाईन प्रक्रियेत अडचणी येऊन वेळेत नोंदणी होत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गडचिरोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी खास बाब म्हणून धान खरेदीच्या ऑनलाइन प्रक्रियेला दिनांक ३१ मार्च, २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात येणार आहे काय,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. छगन भुजबळ (२२-०६-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
तथापि, शेतकऱ्यांच्या Online नोंदणीसाठी पुरेसा वेळ दिला जातो.
(३) खरीप पणन हंगाम २०२१-२२ मध्ये जिल्हाधिकारी, गडचिरोली यांनी केलेल्या विनंतीनुसार शेतकऱ्यांचे हित लक्षात घेता, गडचिरोली जिल्ह्यातील १७ खरेदी केंद्रांवर दि.३१.०३.२०२२ पर्यंत धान खरेदीस मुदतवाढ देण्यात आली होती.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

(४६) ४३५२९ (०४-०४-२०२२). श्री.दौलत दरोडा (शहापूर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्हा परिषदेत शिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी, गट शिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी अशी शिक्षण विभागातील महत्वाची पदे रिक्त असल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रिक्त पदांमुळे अधिकाऱ्यांना इतर विभागांचा प्रभारी पदभार देण्यात आला असून सदर अधिकारी मूळ आस्थापनेच्या जागेवर अधिक वेळ काम करतात व अतिरिक्त वेळ प्रभारी पदासाठी देतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रभारी अधिकारी अपेक्षित काम करत नसल्याने गाव, तालुक्याच्या ठिकाणाहून जिल्हा परिषदेत कामे करुन घेण्यासाठी येणाऱ्या शिक्षकांना शाळेची काम करुन घेण्यासाठी हेलपाटे मारावे लागतात, अशी तक्रार ठाणे जिल्हा शिक्षक भरती संघटनेने जिल्हा परिषदेच्या वरिष्ठांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, रिक्त पदांमुळे शिक्षकांचे प्रश्न प्रलंबित राहिले असून विभागात प्रभारी शिक्षकांमुळे गैरव्यवहाराचे, लाचखोरीचे प्रमाण वाढले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ठाणे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती वर्षा गायकवाड (२९-०६-२०२२) : (१) व (२) अंशत: खरे आहे.
(३) असे निवेदन सदर कार्यालयास प्राप्त नाही.
(४) हे खरे नाही.
(५) रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक) व (माध्यमिक) या पदावर शासन आदेश दिनांक २३.२.२०२२ अन्वये पदोन्नतीने व दिनांक २४.५.२०२२ अन्वये गटशिक्षणाधिकारी या पदावर सरळसेवेने काही अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही

राज्यातील लाकूड तोडीकरीता वनपरिक्षेत्रपाल स्तरावर लाकूडतोडीचे वाहतूक पास देण्याबाबतची

(४७) ४३६९२ (३०-०३-२०२२). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील लाकूड तोडीकरीता वनपरिक्षेत्रपाल (RFO) स्तरावर ५ घनमिटर आणि २० घनमिटर ऐवजी ८ घनमिटर (अनघड) व १०० घनमिटर जळाऊ लाकूडतोडीचे वाहतूक पास देण्याबाबतची मागणी मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.वनराज्यमंत्री व प्रधान सचिव, वने यांचेकडे लेखी निवेदनाव्दारे दिनांक ३० ऑक्टोंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लाकूड तोडीकरीता उपवनसंरक्षक स्तरावर असलेले सर्व अधिकारी स्थानिक पातळीवर वनपरिक्षेत्रपाल स्तरावर देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उद्धव ठाकरे (२८-०६-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) व ३) मा.मंत्री (वने) महोदयांचे अध्यक्षतेखाली दि.८/१२/२०२० रोजी बैठकीत झालेल्या निर्णयानुसार कोल्हापूर जिल्हयातील शेतकरी व लाकुड व्यावसायिक यांच्या मागणीच्या अभ्यासासाठी प्रधान मुख्य वनसंरक्षक (माहिती तंत्रज्ञान व धोरण) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली. सदर समितीच्या झालेल्या बैठकीमध्ये वनपरिक्षेत्र अधिकारी यांना महाराष्ट्र वन नियमावली, २०१४ मधील नियम ३२ (१) (ब) अंतर्गत परवानगी वाढवून देण्याबाबत कोल्हापूर जिल्हयाशिवाय इतर कोणत्याही वृत्तातून निवेदन प्राप्त झालेले नाही. सध्या वनपरिक्षेत्र अधिकारी यांना इमारती ८ घनमीटर व जळाऊ २० घनमीटर पर्यंत वाहतुकीची परवानगी देण्यात आलेले अधिकार हे योग्य आहेत. तसेच ८ घ.मी. पेक्षा जास्त इमारती माल व २० घ.मी. पेक्षा जास्त रचित घनमीटर मालाची मोठी प्रकरणे ही सहाय्यक वनसंरक्षक यांचेपेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्यांची पुर्व मंजुरी शिवाय पास जारी करता येणार नाही, असे नियम ३२ (१) (ब) मध्ये जी तरतूद दिलेली आहे, ती वरिष्ठांचे नियंत्रण आणि सनियंत्रणाच्या दृष्टीने योग्य असल्याने नियमातील सध्याच्या तरतुदी योग्य असल्यामुळे या उपनियमात कोणतेही बदल करणेची आवश्यकता नाही असा निर्णय घेण्यात आलेला आहे.

चंद्रपूर शहरातील झोपडपट्टीवासीयांना स्थायी पट्टे देण्याबाबत

(४८) ४३८५९ (०७-०४-२०२२). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर शहरातील ३९ झोपडपट्याचे सर्वेक्षण करुन आराखडा तयार करुन झोपडपट्टीवासीयांना स्थायी पट्टे देण्याची मागणी गेल्या अनेक वर्षापासून नागरीक व लोकप्रतिनिधींकडून शासनाकडे करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या अनेक वर्षापासून उक्त झोपडपट्टीतील नागरीक येथे वास्तव्य करीत असतांनाही जागेचा स्थायीस्वरुपी पट्टा देण्यात आला नसल्यामुळे त्यांना शासकीय योजनेपासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चंद्रपूर शहरातील झोपडपट्टीवासीयांना स्थायी पट्टे देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.महसूल मंत्री यांच्याकडे वारंवार लेखी निवेदनाव्दारे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (२८-०६-२०२२) : (१), (२), (३) व (४) चंद्रपूर शहरातील झोपडपट्टी वासीयांना स्थायी पट्टे देण्याबाबतची मागणी नागरीकांनी व स्थानिक लोकप्रतिनिधीनी शासनाकडे केलेली आहे.

दि. १७.११.२०१८ च्या शासन निर्णयातील तरतुदीन्वये शहरी भागाकरीता प्रधानमंत्री आवास योजनेनुसार चंद्रपूर जिल्हयातील ३९ झोपडपट्टी घोषित असून त्याअंतर्गत ९२०८ अतिक्रमण धारक आहेत. सदर घोषित ३९ झोपडपट्टयांपैकी १४ झोपडपट्टयांचे अभिन्यास मंजुरीस्तव, नियमामध्ये शिथिलता प्रदान करण्याच्या दृष्टीने संचालक, नगररचना कार्यालय, नागपूर यांना प्रस्ताव पाठविण्यात आले असता, सदर अभिन्यासामध्ये त्रुटी असल्याने त्रुटीची पूर्तता करण्यास्तव परत करण्यात आलेले आहेत. त्रुटीची पूर्तता करण्याचे काम आयुक्त,चंद्रपूर शहर महानगर पालिका, चंद्रपूर यांचे कार्यालयीन स्तरावर सुरु आहे. त्याचप्रमाणे ०१ (बाबानगर)मधील अभिन्यासाच्या अभिलेखात झुडपी जंगल असा शेरा असल्याने सदर जागेचा प्रस्ताव नामंजूर करण्यात आला आहे. उर्वरित २५ अभिन्यासापैकी १० झोपडपट्टयाचे अभिन्यास आयुक्त,चंद्रपूर शहर महानगर पालिका, चंद्रपूर यांचेकडून तयार करण्यात आलेले आहेत व उर्वरित ११ झोपडपट्टयामधील अभिन्यासाची छाननी व सर्वेक्षणाचे काम पूर्णत्वास येवून ०४ प्रकरणे अप्राप्त आहेत.

कोपरगाव बस आगारात बसेसची संख्या वाढविण्याबाबत

(४९) ४४४२६ (१६-०३-२०२२). श्री.आशुतोष काळे (कोपरगाव) सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोपरगाव (जि.अहमदनगर) आगारात पुरेशा प्रमाणात बस उपलब्ध नसल्यामुळे बहुतांश गावात बसच्या फेऱ्या होत नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे विद्यार्थी व नागरिकांना खाजगी वाहनांनी प्रवास करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने प्रत्येक गावात महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाच्या बसेसच्या नियमित फेऱ्या होण्यासाठी कोपरगाव आगारातील बसेसच्या संख्येत वाढ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. अनिल परब (२२-०६-२०२२) : (१), (२) व ३) कोपरगांव आगाराच्या नियमित फे-या चालविण्यासाठी बसेस उपलब्ध आहेत. परंतु रा.प. महामंडळाच्या कर्मचा-यांच्या संपामुळे काही फे-या चालविण्यात येत नव्हत्या.

चालक/वाहक यांच्या उपस्थिती नुसार कोपरगांव आगारातील सर्व फे-या पुर्ववत सुरु करण्यात येत आहे.
(४) विलंब झाला नाही.

महाबीज कंपनीमार्फत बियाणे मागणी करणाऱ्या सर्व शेतकऱ्यांना बियाणांचा पुरवठा करण्याबाबत

(५०) ४४४४२ (२२-०३-२०२२). श्री.आशुतोष काळे (कोपरगाव) सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शेतकरी खरीप व रब्बी पिकांची पेरणी करण्याकरीता महाबीज कंपनीकडे बियांणांची मागणी करीत असून सदर कंपनी काही ठराविक शेतकऱ्यांना पुरवठा करीत असून इतर शेतकऱ्यांना बियाणांचा पुरवठा होत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या शेतकऱ्यांना बियांणांचा पुरवठा होत नाही त्या शेतकऱ्यांचे बियाणांअभावी हाल होत असून, त्यांचे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे का,
(३) असल्यास, जे शेतकरी बियाणांसाठी मागणी करतील त्या सर्वच शेतकऱ्यांना बियाणांचा पुरवठा करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?
श्री. दादाजी भुसे (२२-०६-२०२२) : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) कृषि विभागाद्वारे विविध योजनांमधून महाडीबीटी अंतर्गत ऑनलाईन पध्दतीने निवड केलेल्या शेतकऱ्यांना बियाणे अनुदानित दराने विक्री केली जाते. तसेच सर्वसाधारण विपणनांतर्गत विना अनुदानित दराचे विक्रीसाठी उपलब्ध बियाणे हे राज्यातील महाबीज विक्रेते व उपविक्रेते यांचे मार्फत मागणी करणाऱ्या शेतकऱ्यांना विक्री करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
नागपूर.

राजेन्द्र भागवत
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.